

कुष्ठरोग निवारण समिती

संचलित

# बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्र, शांतिवन

पो. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड. पिन - ४१० २०६. फोन नं : ०२१४३-२३८१५४
e-mail :krnbmpjkshantivan@gmail.com

गावाचा सर्वांगिण विकास देशाच्या वा राज्याच्या राजधानीत बसून आखलेल्या योजनांनी होणार नाही  तो प्रत्यक्ष गावकऱ्यांच्या सहभागातूनच होईल.सामाजिक , आर्थिक ,राजकीय जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणावयाचा असेल तर लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दिशेने वाटचाल करण्यावाचून गत्यंतर नाही.

- पंचायतराज जनक बलवंतराय मेहता



## बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्र समिती

अध्यक्ष- श्रीमती रक्षा मेहता

सदस्य - विष्णू प्रभूदेसाई
सदस्य - जयवंत मठकर
सदस्या - उषा  जाधव
सदस्या -फाल्गुनी मेहता

सदस्य - संजय गुळुंबकर
सदस्य - योगेश म्हात्रे
सदस्य  -  संजय  वानखेडे
सदस्या - जयश्री पाटील

कुष्ठरोग निवारण समितीची सोसायटी नोंदणी कायदा १८६० व मुंबई सार्वजनिक न्यास कायदा १९५० प्रमाणे  नोंदणी क्र. ई -४२ के मध्ये नोंदणी झालेली आहे.कुष्ठरोग निवारण समितीला नोंदणी क्र.०८३८५०००२ प्रमाणे परदेशी देणग्या स्विकारण्यास परवानगी मिळाली आहे . तसेच समितीला  मिळणाऱ्या देणग्या ८०- जी आयकर कलमाखाली करमुक्त आहेत.

## बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्र

भारतीय पंचायतराजचे जनक स्वर्गीय श्री बलवंतराय मेहता यांच्या जन्मशताब्दीच्या वर्षात देशभर अनेक कार्यक्रम घेण्यात आले. संस्थेने केवळ एक दिवस स्मृति जागविण्या ऐवजी त्यांना अपेक्षित असलेले व त्यांच्या हातून अधुरे राहिलेले पंचायतराज व्यवस्था बळकट करण्याचे काम पुढे न्यावे असा निर्णय घेऊन श्रीमती रक्षा मेहता यांनी या कामाची सर्व जबाबदारी स्विकारली. लोकजागृती, लोकशिक्षण, अभ्यास, संशोधन, असा सर्वांगाने या केंद्रामार्फत काम करण्यात आले.

### १) पंचायतीराज संदर्भात कार्यक्रम :-

(अ) मतदार जागृती (ब) ग्रामसभा सबलीकरण (क) ग्रामसभा सक्षमीकरणाकरीता कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण(ड)गरिबांवर होणारे अन्याय व अत्याचार विरुध्द त्यांनी संघटित होऊन आपले प्रश्न सोडवावेत असा मार्गदर्शनाचा प्रयत्न असतो. महाराष्ट्र शासन, राज्य ग्रामीण विकास संस्था,यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), रायगड जिल्हा परिषद यांच्यातर्फे राष्ट्रीय ग्राम स्वराज योजनेतंर्गत पंचायत सदस्य क्षमता वृध्दी प्रशिक्षण उपक्रम - नवनिर्वाचित ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या सरपंच व सदस्यांना प्रशिक्षण दिले जाते .

**२) स्वर्गीय बलवंतराय -सरोजबेन मेहता यांच्या स्मरणार्थ दरवर्षी महाराष्ट्रामधील रायगड जिल्हास्तरीय रूपये २५,०००/- व मानचिन्ह उत्कृष्ठ ग्रामपंचायत पुरस्कार दिला जातो.**

### ग्रामीण विकासाचे विविध उपक्रम :-

**३) सफाई प्रशिक्षण :-** ग्राम स्तरावर स्वच्छतेच्या सात घटकांचा विकास होण्यासाठी सफाई प्रशिक्षण शिबीर व उपक्रमाचे नियोजन करून आयोजन केले जाते. गावांची आदर्श सफाई होईल असे स्वच्छतेच्या सातत्यासाठी नियोजन व प्रशिक्षण दिले जाते. निर्मल भारत व विविध अभियानातंर्गत शासकीय अधिकारी व अशासकीय व्यक्ती तसेच लोकप्रतिनिधी यांचे प्रशिक्षण शिबीराचे आयोजन केले जाते

**शौचालय योजना :-** ग्रामीण भागातील महिला व बालके, वृध्द, कुटुंबाच्या आरोग्याच्या कल्याणाकरीता शौचालय योजना राबविली जाते.

**मुख्य साधन संस्था :- महाराष्ट्र शासनाने पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातर्फे राज्यस्तरीय मुख्य साधन संस्था अशी मान्यता दिली आहे.**

(४) सेंद्रिय खते व परसबाग योजना:-
(अ)सेंद्रिय खत निर्मिती प्रयोग-(१) कंपोस्ट खत, (२) गांडूळ खत (ब) सेंद्रिय शेती प्रचार -प्रसार, (ड) शेतकरी मेळावे व प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन (श) सेंद्रिय पध्दतीने उत्पादित मालाची विक्री मार्गदर्शन (फ) परसबाग योजना
(ज) शेती विकास योजना - आर्थिक उत्पन्न वाढावे म्हणून अल्पभूधारक शेतकरी यांच्या शेती विकासाकरीता बोअरवेल मोटारपंप व ऑइल इंजिन दिले जाते .
(५) पाणी प्रश्न :- (अ) ग्रामस्थांच्या गरजेनुसार स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी नळपाणी पुरवठा योजना लोकांच्या सहभागाने कार्यान्वित करणे. (ब) बोअरवेल (क) मोटरपंप आणि ऑईल इंजिन
(६) महिला सक्षमीकरण :- (१) बचत गट (२) महिला शिबीरे (जाणीव जागृती) (३) महिला ग्रामसभांचे सक्षमीकरण (४) महिला स्वयंरोजगार (५) कौशल्य विकास प्रशिक्षण (६) स्वयंरोजगार प्रशिक्षण (७) मेणबत्ती व अगरबत्ती (८) शिलाई मशिन उद्योग (९) फर खेळणी (१०) गोधडी शिवण प्रकल्प
(७) समाजमंदिर योजना :- ग्रामस्थांच्या मागणीनुसार
(८)प्रशिक्षण (निवासी) :- (अ) विदेशी विद्यार्थ्यांसाठी
(ब) विद्यापीठातंर्गत विद्यार्थ्यांना (क)एन.एस.एस.शिबीर,
(९) पंचायतराजजनक बलवंतराय मेहता जीवनपट संग्रहालय
(१०) सरोजबा संदर्भ ग्रंथालय
(११) श्री अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे आदिवासी आश्रमशाळा :-
आजूबाजूच्या दुर्गम परीसरातील आदिवासी जमातीचे लोक परंपरेने शिक्षणाला आकर्षित होणारे नव्हते. आपल्या वाढत्या वयातील अपत्यांच्या शिक्षणावर खर्च करणे त्यांना लाभदायक वाटत नव्हते. त्यासाठी आवश्यक सोयी सुविधासुध्दा त्यांना उपलब्ध नव्हत्या. अशा मुलामुलींच्या शिक्षणाची गरज भागविण्यासाठी १९९४ साली संस्थेने श्री अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे आदिवासी आश्रमशाळेची स्थापना केली .

आज या शाळेत ४०० वसतीगृहात राहणारे व १०० बाहेरून शाळेत येणारे असे मिळून ५०० मुले-मुली १ ते १० वी इयत्तांमध्ये शिकत आहेत. ही आदिवासी मुले समाजाच्या अत्यंत गरीब स्तरातून आलेली असून त्यांच्या कुटुंबातील शाळेत जाणारी पहिलीच पिढी आहे हे खास वैशिष्ट्यच ठरावे . त्यांच्या पालकांची पसंती ग्राह्य मानली तर त्यांना आपली मुले शाळेत घालणे आवडणार नाही कारण बालमजूर म्हणुन ही

मुले त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक कमाईसाठी उपयोगी पडली असती , त्यांच्या आई -वडीलांसह त्यांची मुले सुध्दा एक टोळी म्हणून विटांच्या भट्ट्या, रस्ते बांधणीचीठिकाणे, शेतमशागत, मोलमजूरी वगैरे कामे करण्यात सहभागी होऊ शकतात. त्यांच्या एकत्र टोळीला सर्वसाधरणपणे कंत्राटदाराकडून खंडप्राय मजूरी मिळते. अशा परिस्थितीत या मुलांना शिक्षणासाठी येथील आश्रमशाळेत दाखल करून घेण्याबाबत सुरूवातीला त्यांच्या पालकांची कमालीची मनधरणी करावी लागली. (अ) विद्यार्थ्यांकरीता निवास व्यवस्था
(आ) पालक -बालक मेळावे (इ) व्यावसायिक प्रशिक्षण
(ई) लॅग्वेज लॅब (उ) सुतकताई विभाग (ऊ) असेंब्ली हॉल,
(ए) शैक्षणिक सहलीचे आयोजन केले जाते.

सामाजिक संस्थाबरोबर व्यावसायिक दृष्टीने चालविण्यात येणाऱ्या सभा परीषद , चिंतन बैठक,प्रशिक्षण निवासी शिबीरांसाठी बलवंतराय मेहता केंद्राच्या सुविधांचा उपयोग करता येईल.

व्यवस्थांचा रोजचा खर्च तपशील खालीलप्रमाणे

| | रूपये |
|---|---|
| (१) सभागृह | १,५००/- |
| (२) परिषद हॉल | ५००/- |
| (३) गेस्ट रूम | ६०० /- |
| (४) निवास | १७५/- |
| (५) भोजन | ४००/- |
| (६) स्वयंपाकगृह (किचन) | ५००/- |
| (७) भोजन कक्ष (डायनिंग हॉल) | ७५०/- |

असे समग्र विकासाचे व जागृतीचे काम सूरू केले. अनेक संस्थांनी या कामात बलवंतराय मेहता पंचायतीराज जागृती केंद्राला मदत केली. इनरव्हील क्लब्स डीस्ट्रीक्ट ३१४ इनरव्हील पब्लिक सर्व्हिस कमिटी - मुंबई , विविध भागातील रोटरी क्लब्स, रोटरी इंटरनॅशनल आणि इंटरनॅशनल इनरव्हील, शेठ वालचंद हिराचंद मेमोरियल ट्रस्ट , रतनचंद फाऊंडेशन , वर्ल्ड हंगर प्रोजेक्ट , भारतीय औद्योगिक विकास बँक , टाईम अॅण्ट टॅलेन्ट क्लब, कॉउंटेस ऑफ डफरीन फंड, हिंदूस्तान पेट्रोलियम कार्पो . लि. , क्रॉम्पटन ग्रीव्हज , दिनशॉ एडनवाला ट्रस्ट , शासनाचे विविध विभाग , मणीभवन गांधी संग्रहालय -मुंबई , इंडियन रेड क्रॉस सोसायटी , एच.डि.एफ.सी., गांधी स्मारक निधी, चान्स ऑफ लेबेन इ.व्ही. झोंटा इंटरनॅशनल, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, इंडस इंटरनॅशनल, सॅली अॅलेक्झांडर आणि मित्र परिवार इ. संस्थांची मदत मिळते.



गाव विकास मार्गदर्शन



पंचायतराज प्रशिक्षण



पंचायतराज मेळावा



बलवंतराय सरोजबेन मेहता
जिल्हास्तरीय उत्कृष्ठ ग्राम. पुरस्कार



पाणी पुरवठा योजना



शेततळी योजना



सॅनिटेशन पार्क



स्वच्छता मार्गदर्शन प्रशिक्षण



बचत गट मार्गदर्शन योजना



गाव सफाई मार्गदर्शन योजना



उपसा सिंचन योजना



शौचालय योजना



समाज मंदिर योजना



सेंद्रिय शेती प्रशिक्षण



गो पशू खाद्य



परसबाग योजना



मेणबत्ती प्रशिक्षण



ज्वेलरी प्रशिक्षण



अगरबत्ती प्रशिक्षण



गोधडी शिवण प्रकल्प योजना



आदिवासी आश्रम शाळा



लँग्वेज लॅब



सुतकताई विभाग



विदेशी विद्यार्थी शिबीर